नि.दि.दावा क्र.५३/२०१३
शिवाजी एकनाथ वगैरे विरुध्द
विश्वनाथ त्रिंबक वाघ वगैरे

## : निशाणी क्र.३० कडील आदेश :
(घोषित दिनांक ०२.०९.२०१६)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता केलेला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात अशी आहेत की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द मोजणी व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत सर्व्हे क्र.१८० मधील पोटहिश्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची वहिवाट असताना प्रतिवादी क्र.१ व २ हे वादीचे दावा मिळकतीतील सर्व्हे क्र.१८०/२ब/१ पैकी पश्चिमेकडील २ हे ५ आर व सर्व्हे क्र.१८०/२अ पैकी दक्षिणेकडील १ हे २३ आर क्षेत्राच्या मालकीहक्क कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करित आहेत. दिनांक ११.०६.२०१६ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सर्व्हे क्र.१८०/२ब/१ मध्ये जेसीबीच्या सहाय्याने शेततळयासाठी खोदकाम चालु केले. वादींनी त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु प्रतिवादींनी वादींना न जुमानता खोदकाम चालुच ठेवले. तसे झाल्यास वादींचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.३२ कडे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असून अर्जातील संपुर्ण मजकुर अमान्य केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनांप्रमाणे, सर्व्हे क्र.१८०/२ब/१ चे क्षेत्र प्रतिवादी क्र.१ ने खरेदी घेतलेले आहे. त्यामुळे त्या मिळकतीविषयी वादींना दाद मागण्याचा अधिकार नाही. त्यानंतर वादीचा भाऊ काशिनाथ याने रे.मु.क्र.७९/२०१० चा दावा वाटपाकरिता केला व त्यामध्ये तडजोड होऊन सदर मिळकतीपैकी दक्षिणपुर्व कोप—यातील ४१ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ ला देण्यात आले. याच मिळकतीतील ३५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ चे वडिल त्रिंबक यांनी प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे नावे मृत्युपत्राने दिलेले आहे. या क्षेत्रास जोडुन

प्रतिवादी क्र.१ चे ४१ आर क्षेत्र उत्तर बाजुस आहे. प्रतिवादी क्र.२ ने गट क्र.१७९/१/४/१ मध्ये शेततळयाचे काम चालु केलेले असून ते ८० टक्के पुर्ण झालेले आहे. या परिस्थितीत प्रतिवादींना शासनाच्या सवलतीचा लाभ होऊ नये या उददेशाने वादीने खोटे अर्ज तालुका कृषी अधिकारी यांचेकडे दिले. तसेच सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. शेततळयाचे काम पुर्ण न झाल्यास प्रतिवादींचे फार मोठे नुकसान होईल. सदरचे शेततळे सर्व्हे क्र.१८०/२ब/१ मध्ये नाही. त्यामुळे वादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब या कारणास्तव अर्ज नामंजुर करण्याची प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थी समोर येतात. त्यावर कारणांसह निष्कर्ष देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी त्यांच्या लाभात सकृतदर्शनी बाब सिध्द करतात काय ? | —— | होय |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजुने आहे, असे वादींनी सिध्द केले आहे काय ? | —— | होय |
| ३. | तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कशानेही न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होईल, असे वादी सिध्द करतात काय ? | —— | होय |
| ४. | आदेश काय ? | —— | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## **कारणमिमांसा**

### **मुद्दे क्र.१ ते ३ करिता :—**

५. सर्व्हे क्र.१८०/२ब/१ मध्ये ४१ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ यास दिलेले आहे हे वादींना मान्य आहे. वादींचे कथनांप्रमाणे या क्षेत्रातील हद्दीखुणा अदयापि निश्चित झालेल्या नाहीत. असे असताना, प्रतिवादी

मोजणी करण्यास संमती न देता हरकत अडथळा करतात. प्रस्तुत अर्जामध्ये वादींचे कथनांप्रमाणे प्रतिवादी सर्व्हे क्र.१८०/२ब/१ या मिळकतीमध्ये शेततळयाचे काम करीत आहेत. याउलट प्रतिवादींचे कथन असे आहे की, सदरचे शेततळे हे सर्व्हे क्र.१७९/१/४/१ मध्ये आहे. याकामी प्रतिवादींतर्फे निशाणी क्र.३३ सोबत दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये तालुका कृषी अधिकारी कर्जत यांचेकडे वादी क्र.४ ने दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्यास अनुसरुन वादीतर्फे निशाणी क्र.३७ सोबत पंचनाम्याची प्रत दाखल करण्यात आलेली आहे. सदरचे दोन्ही कागद पाहता, वादी क्र.४ ने दिलेल्या तक्रारीनुसार पंचनामा करण्यात आला व त्यामध्ये सर्व्हे क्र.१७९/१/४/१ मध्ये शेततळे मंजुर झालेले असून त्याची आखणी करुन देण्यात आली होती. परंतु प्रतिवादी क्र.२ ने सर्व्हे क्र.१७९ व १८० या दोन्ही क्रमांकांमध्ये शेततळयाचे खोदकाम चालु केले असे नमुद आहे. त्यामुळे सदरच्या शेततळयाचे खोदकाम बंद ठेवण्यात आलेले आहे असाही पंचनाम्यामध्ये उल्लेख आहे. सदरचा पंचनामा पाहता, प्रतिवादी क्र.२ ने शेततळयाचे खोदकाम सर्व्हे क्र.१७९ व १८० या दोन्हीमध्ये चालु केलेले आहे ही बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते.

६. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता, उभय पक्षांच्या मिळकतींमधील हद्दीखुणा निश्चित करुन मागितलेल्या आहेत. सदरच्या हद्दीखुणा निश्चित होईपावेतो उभय पक्षांचे क्षेत्र व हद्दी निश्चित ठरणार नाहीत. तसेच वर नमुद केलेला पंचनामा पाहता, शेततळयाचे बांधकाम सर्व्हे क्र.१८० मध्येही सुरु आहे असे दिसून येते. दाव्यातील मागणीबाबत अंतिम निर्णय होईपावेतो अशाप्रकारे नविन कोणतेही खोदकाम व बांधकाम वाद मिळकतीमध्ये होणे न्यायोचित होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता, सर्व्हे क्र.१८० मध्ये देखिल शेततळयाचे खोदकाम चालु आहे हे सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याने, वादी त्यांच्या लाभात सकृतदर्शनी बाब सिध्द करतात.

७. वादी त्यांच्या हक्कात सकृतदर्शनी बाब सिध्द करत असल्याने न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे हे देखिल सिध्द होते. या परिस्थितीत तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होईल. सबब मुददे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u> :—**

८. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता व मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष पाहता, मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्ज (नि.क्र.३०) खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी, वाद मिळकत सर्व्हे क्र.१८०/२ब/१ मध्ये दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत कोणत्याही प्रकारचे खोदकाम, शेततळे करु नये, म्हणुन त्यांस या आदेशाद्वारे तुर्तातुर्त प्रतिबंधित करण्यात येत आहे.

दिनांक : ०२.०९.२०१६
कर्जत.

सही/—
( आरती कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Devidas L. Amrute |
| Court | : | Aarti Kulkarni, Jt.Civil Judge,J.D., & J.M.F.C., Karjat. |
| Date of Order | : | 02.09.2016 |
| Order signed by the P.O. | : | 02.09.2016 |
| Order uploaded on | : | 02.09.2016 |

===================